# ''स्पर्धा परीक्षांचा इतिहास आणि महाराष्ट्रात घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा: एक अभ्यास''

**मोहिनी मधुकरराव राऊत**[1]
**पी.एच.डी.संशोधिका**
**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र**
**राट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

**डॉ. सुभाष वा. धोटे** [2*]
**ग्रंथपाल**
**हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर**
***इमेल: swdhote@gmail.com**

**सारांश:**

''स्पर्धा परीक्षांचा इतिहास आणि महाराष्ट्रामध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा: एक अभ्यास'' या संशोधनाचा मुख्य उद्देश स्पर्धा परीक्षा म्हणजे काय? हे जाणून घेणे. त्यासोबतच स्पर्धा परीक्षांच्या ऐतिहासिक विकासाचा आठावा घेणे व त्यासोबतच महाराष्ट्रात घेतल्या जाणाऱ्या प्रमुख स्पर्धा परीक्षेंचा अभ्यास करणे आहे. या संशोधनामध्ये प्राचीन काळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय प्रशासकीय रचनेतील परीक्षापध्दतीचा अभ्यास करण्यात आला आहे.

तसेच महाराष्ट्रातील विविध स्पर्धा परीक्षेविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. एम.पी.एस.सी., पोलीस भरती, शिक्षक भरती इत्यादी परीक्षांचे स्वरूप पात्रता व अटी, रचना यांचा अभ्यास केला आह. या अभ्यासातून असे दिसून येते की, स्पर्धा परीक्षा प्रणाली ही गुणवत्तेवर आधारीत निवड करण्याची प्रक्रीया असून यामुळे प्रशासनात पारदर्शकता येते. महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षा ही युवकांना आपल्या पात्रतेनुसार योग्य संधी उपलब्ध करूण देणारी यंत्रणा आहे.

सुचक शब्द: स्पर्धा परीक्षा, इतिहास, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, प्रशासन

**प्रस्तावना:**

## स्पर्धा परीक्षा म्हणजे काय?

स्पर्धा परीक्षा म्हणजे अशी परीक्षा ज्यामध्ये मर्यादीत जागांसाठी किंवा पदासाठी मोठया संख्येने उमेदवार सहभागी होतात आणि त्यांच्या गुणवत्तेनुसार निवड केली जाते. या परीक्षांमध्ये उमेदवारांची बौध्दीक क्षमता, ज्ञान, विश्लेशण शक्ती व निर्णयक्षमता यांचे मुल्यमापन केले जाते.

Competative Examination म्हणजे अशी परीक्षा ज्यामध्ये उमेदवारांची परस्पर तुलना करून मर्यादीत जागांसाठी निवड केली जाते. (Oxford Advanced Larner's Dictionary)

स्पर्धा परीक्षा म्हणजे सार्वजनिक पदे, शैक्षणिक प्रवेश आणि शियवृत्तीसाठी गुणवत्तेच्या आधारे निवड करण्याची पध्दत (Encyclopedia Britanica)

स्पर्धा परीक्षा या संविधानाच्या तरतुदीनुसार केंद्रीय सेवांसाठी गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यासाठी घेतल्या जातात. (UPSC. Examination & Recuutment rules)

स्पर्धा परीक्षा ही आधुनिक लोकशाही व्यवस्थेचा भाग आहे. गुणवत्तेवर आधारीत प्रशासन हे लोकशाही व्यवस्थेमध्ये महत्वपुर्ण आहे. प्रशासकीय पदासाठी पारदर्शक आणि निपक्षःपातीपने निवडप्रक्रीया राबविण्यासाठी स्पर्धा परीक्षा पध्दतीचा अवलंब केला जातो. भारतात आणि महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षा पध्दती विकसित झाली असून त्यानुसार अनेक स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात.

## संशोधनाचे उद्दीट्ये:—

१. स्पर्धा परीक्षांचा ऐतिहासीक विकास अभ्यासने
२. महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षांची संरचना समजुन घेणे.
३. स्पर्धा परीक्षेचे सामाजिक आणि/शैक्षणिक महत्व अधोरेखीत करणे.
४. विविध स्पर्धा परीक्षांची माहीती उपलब्ध करून देणे.

## संशोधन पध्दती:—

या संशोधन पत्रिकेसाठी वर्णनात्मक व विश्लेणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून त्यासाठी पुस्तके, संशोधन लेख, अधिकृत संकेतस्थळे आणि प्रशासन अहवाल यांचा वापर करण्यात येईल.

## स्पर्धा परीक्षांचा इतिहास:—

## चीनमधील इम्पीरियल परीक्षा प्रणाली:—

जगातील पहिली औपचारिक स्पर्धा परीक्षा प्रणाली म्हणून चीनमधील 'Imperial Examination' या पध्दतीचा उल्लेख केला जातो. ही पध्दत सुमारे इ.स. पुर्व २ रे शतक ते इ.स. ७ वे

शतक या काळामध्ये विकसित झाली Sui Dynasty आणि Tang Dynasty (६१८—९०७) यांच्या काळात या परीक्षा पध्दतीचा वापर करून गुणवत्तेच्या आधारावर उमेदवारांची सरकारी पदासाठी निवड केली जात होती.

**ब्रिटीशपुर्व प्रशासन व भरती पध्दती:—**

प्राचीन काळामध्ये राजेशाही अस्तित्वात होती. ज्यामध्ये राजा हा प्रमुख प्रशासक असून वारसाहक्काने हे पद त्याकडे येत असे व प्रशासन राजाच्या इच्छेनुसार चालत असे. नियुक्त्या हया प्रामुख्याने वंशपरंपरागत किंवा शिफारशीवर आधारीत असत. गुणवत्तेवर आधारित परीक्षा पध्दती त्या काळामध्ये अस्तित्वात नव्हती.

**ब्रिटीश काळातील नागरी सेवा:—**

भारतातील आधुनिक नोकरशाही संरचना निर्माण करण्यात ईस्ट इंडीया कंपनीची भुमिका महत्वाची होती. ईस्ट इंडीया कंपनीने व्यापाराच्या दृटीकोणातुन भारतामध्ये वसाहत निर्माण केली. त्यानंतर हळूहळू त्यांनी आपले प्रादेशिक अधिग्रहण वाढवत भारतामध्ये आपल्या वसाहती वाढवल्या. त्यामुळे ऑपचारिकता, सुव्यवस्था आणि संघटनेची आवश्यकता निर्माण होऊन नोकरशाही व्यवस्था निर्माण झाली. १८५३ मध्ये ब्रिटीश संसंदेने सनद बदलून गुणवत्ताधारीत भतरीची अंबलबजावणी केली. ब्रिटीशांनी भारतीय नागरी सेवा (ICS) ची स्थापना केली. ज्यामध्ये बहुतेक ब्रिटीश लोक होते. जिल्हाधिकारी, कलेक्टर, सचिव इ. पदे ICS अधिकाऱ्यांकडे असत. भारतीय नागरी सेवेसाठी परीक्षा फक्त लंडणमध्ये घेतल्या जात होत्या आणि वयोमर्यादा १८ ते २३ निश्चित करण्यात आली होती. अभ्यासक्रम कठीण असल्यामुळे भारतीयांना यशस्वी होणे कठीण होते. १८६४ मध्ये श्री. रविंद्रनाथ टागोर यांचे बंधु श्री. सत्येंद्रनाथ टागोर हे परिक्षेत यशस्वी होणारे पहिले भारतीय बनले.

**ऐचिसन समिती :— (१८८६)**

भारतीयांनी भारतात व लंडनमध्ये एकाचवेळी परीक्षा घेण्याच्या मागणीसाठी अर्ज केला परंतु त्यात यांना यश मिळाले नाही. १८८५ मध्ये भारतीय रा ट्रीय कॉग्रेसच्या स्थापनेनंतर ही मागणी वाढत गेली. या वाढत्या मागणीनंतर लॉर्ड डफरीन यांनी १८८६ मध्ये एचिसन समितीची नियुक्ती केली. या आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार एकाच वेळी परीक्षेची मागणी फेटाळली व प्रांतीय नागरी सेवा स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला आणि भारतीयांसाठी वयोमर्यादा १९ आणि २३ ही सुचविण्यात आली. यानुसार प्रांताच्या नावावरून प्रांतीय सेवा म्हटले जाते.

**Government of India Act 1919 :-**

भारतीय इतिहासाच्या संदर्भात १९१९ च्या भारत कायद्याद्वारे मांटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा भारतात अधिक प्रसिध्द आहेत. या कायद्यानुसार भारतातदेखील नागरी परीक्षा घेण्यास सुरूवात झाली आणि यामध्ये भारतीयांचा सहभाग वाढला.

**लोकसेवा आयोगाची स्थापना (१९२६)**

१९२४ मध्ये ली कमिशनने त्यांच्या अहवालात शिफारस केल्याप्रमाणे १ ऑक्टोंबर १९२६ रोजी लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यात अध्यक्षाव्यतिरिक्त चार सदस्य होते. युनायटेड किंगडमच्या गृह नागरी सेवेचे सदस्य सर रॉस बार्कर हे पहिले अध्यक्ष होते.

**भारत सरकार कायदा (१९३५)**

१९३५ मध्ये भारत सरकार कायदा लागू करण्यात आला. या कायद्यानुसार प्रांतिक स्वायत्ता अधिक वाढविण्यात आली. १९२६ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना झाली होती. त्यानंतर प्रांतिक स्तरावर स्वतंत्र लोकसेवा आयोग निर्माण झाले. ही व्यवस्था आधुनिक लोकसेवा आयोगाचा पाया ठरली.

**स्वातंत्र्यानंतरची व्यवस्था:—**

१९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय राज्यघटना तयार करण्यात आली. भारतीय राज्यघटनेतील कलम ३१५ ते ३२३ अंतर्गत लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली. घटना लागू झाल्यानंतर २६ जानेवारी १९५० ला Union Public Service Commission (UPSC) आणि Maharastra Public Service Commission (MPSC) ची स्थापना करण्यात आली.

**Union Public Service Commission (UPSC)**

**केंद्रीय लोकसेवा आयोग:—**

UPSC स्थापना १९५० मध्ये झाली. UPSC ही भारतातील केंद्रीय स्तरावरील सर्वोच्च भरती संस्था आहे. UPSC विविध अखिल भारतीय व केंद्रीय सेवांसाठी स्पर्धा परीक्षा घेते. IAS, IPS, IFS, IRS, IAAS इत्यादी भरती या परीक्षेद्वारे केली जाते. ही परीक्षा प्रामुख्याने तीन टप्प्यात घेतली जाते.

१. पुर्व परीक्षा

२. मुख्य परीक्षा

३. मुलाखत

शैक्षणिक पात्रता:— मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणतीही पदवी. वयोमर्यादा २१ ते ३२ वर्षे.

**महाराष्ट्रात घेतल्या जाणाऱ्या प्रमुख परीक्षा:—**

(MPSC) Maharashtra Public Service Commission ची स्थापना महाराष्ट्र राज्यामध्ये १९६० साली झाली. कलम ३१५ ते ३२३ मध्ये राजय लोकसेवा आयोग स्थापना व कार्य समाविट करण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन राज्यातील गट अ, अट ब, गट क सेवांसाठी परीक्षा घेतल्या जातात. MPSC मार्फत पुढील परीक्षा घेतल्या जातात.

**राज्य सेवा परीक्षा (State Services Examination-SSC):—**

उपजिल्हाधिकारी (Deputy Collector), पोलीस उपअधिक्षक (DYSP), तहसिलदार, गटविकास अधिकारी इत्यादी पदासाठी परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा प्रामुख्याने तीन टप्प्यांमध्ये घेतली जाते.

१. पुर्व परीक्षा

२. मुख्य परीक्षा

३. मुलाखत

पात्रता:— १) कोणत्याही शाखेतील पदवी प्राप्त करणे अनिवार्य आहे.

२) वयोमर्यादा साधारणपणे १९ ते ३८ आहे.

**संयुक्त गट 'ब' परीक्षा:—**

याद्वारे पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक, सहाय्यक कक्ष अधिकारी या पदांसाठी परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा प्रमुख्याने चार टप्पे असतात.

१. पुर्व परीक्षा

२. मुख्य परीक्षा

३. शारीरीक चाचणी (PSI) साठी

**पात्रता:—** १) कोणत्याही शाखेतील पदवी प्राप्त करणे अनिवार्य आहे.

२) PSI साठी शारीरीक निकष आवश्यक.

**संयुक्त गट 'क' परीक्षा :–**

या अंतर्गत लिपिक–टंकलेखक, कर सहाय्यक, तांत्रिक सहाय्यक या पदासाठी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षा दोन टप्प्यांमध्ये घेतल्या जातात.

१. पुर्व परीक्षा

२. मुख्य परीक्षा

**पात्रता**:– या पदासाठी १२ किंवा पदवी असणे आवश्यक आहे.

**अभियांत्रिकी सेवा परीक्षा:–**

सिव्हिल मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल या क्षेत्रामधील सहाय्यक अभियंता, उपअभियंता या पदांकरीता घेतल्या जातात. याकरीता संबंधीत शाखेतील अभियांत्रिकी पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे.

**वन सेवा परीक्षा:–**

सहाय्यक वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल या पदाकरीता परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा चार टप्प्यांमध्ये घेतली जाते.

१. पुर्व परीक्षा

२. मुख्य परीक्षा

३. शारीरीक चाचणी

४. मुलाखात

१. कृषी सेवा परीक्षा:– कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी या पदांसाठी ही परीक्षा घेतली जात असून याकरीता कृषी शाखेतील पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे.

**शिक्षक व शिक्षण क्षेत्र:–**

Maharashtra State Council of Examinaiton (MSCE) मार्फत खालील परीक्षा घेतल्या जातात.

१. TET (Teacher Eligibility Test)

२. SET (State Elegibility Test)

**TET** :– TET शिक्षक पात्रता परीक्षा ही सरकारी शिक्षक भरतीसाठी घेतली जाते. ही परीक्षा प्रत्येक राज्याच्या व्यावसायीक परीक्षा मंडळाद्वारे घेतली जाते. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवाराला १ ते ५ व इयत्ता ६ वी साठी प्राथमिक शिक्षक आणि इयत्ता ६ ते ८ वी साठी उच्च प्राथमिक शिक्षक नियुक्तीसाठी पात्रता प्रमाणपत्र दिले जाते. TET परीक्षेत दोन पेपर असतात. पेपर १ हा प्राथमिक शिक्षकांसाठी व पेपर २ हा उच्च प्राथमिक शिक्षकांसाठी आहे. या परीक्षेसाठी D.Ed. किंवा B.Ed. ही पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे

**SET** :– महाराष्ट्रामध्ये MSCE मार्फत ही परीक्षा घेतली जाते. यासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठातुन पदव्युत्तर पदवी मध्ये खुल्या प्रवर्गासाठी किमान ५५ % आणि राखिण प्रवर्गासाठी (SE/ST/OBC/PWD) ५०% गुण आवश्यक आहे. ही परीक्षा प्राध्यापक पदासाठी घेतली जाते.

वरीलप्रकारे महाराष्ट्रामध्ये अनेक स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात.

**निकर्षः–**

वरील संशोधनावरून हे लक्षात येते की, स्पर्धा परीक्षा ही ब्रिटीश काळापासून सुरू झाली व आजही ही पध्दती अस्तीत्वात आहे. ही लोकशाही व्यवस्थेचा महत्वाचा पाया आहे. महाराष्ट्रत Maharashtra Public Service Commission (MPSC) प्रभावीपने परीक्षा घेत आहे. तथापी सामाजिक समता आणि गुणवत्तेची हमी देण्यासाठी या परीक्षा पध्दतीमध्ये सुधारणा आवश्यक आहे. या स्पर्धा परीक्षेमुळे प्रशासनात कुशल आणि कर्तव्यनिठ अधिकारी निर्माण होण्यास मदत होते.

**संदर्भः–**


1. Britanica, https://www.britanica.com
2. Dayma, Brijmohan.set/net Margadarshan, Vidhyabharti Prakashan (26.Ed)
3. Elman, BA (2000). A Cultural history of Civil Examination in late Imperial China.books.google.com
4. History of CIVIL SERVICES IN INDIA - Pre Independence Era- Competition Success Blog https:share.google.
5. MPSC बद्दल संपुर्ण माहीती : mpsckida.com. https://www.mpsekida.com
6. TET शिक्षक पात्रता परीक्षेबद्दल पुर्ण माहीती https://sradalvifoundation.com
7. Union Public Service Commission (nd) https://www.upsc.gov.in
8. Zang, mengzhong & nlune, Divya. The East India Company Role in the foumulation and development of India civil service. Malaysian Journal of social sciences and humanities (2025), volume 10. Issue-4